क्र.रेतीगट/गौख/टे-२/कावि-३७/१०
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक :- २९/०१/२०१०.

# खाडीपात्रातील रेती/वाळू जाहीर लिलाव

सर्व जनतेच्या माहितीसाठी जाहीर करण्यात येते की, शासन निर्णय क्र.गौखनि-१०/२००३/प्र.क्र./५१/ख दिनांक ५ सप्टेंबर २००३ अन्वये **ठाणे जिल्हयातील** खाली नमुद केलेल्या खाडीपात्रातील रेती गटात उपलब्ध असलेल्या रेती/वाळू साठयाचे उत्खनन/विक्री करणेचे अधिकार देणेकामी मोहरबंद निविदा मागवून, तसेच खुल्या लिलाव पध्दतीने अशी एकत्रित पध्दत अवलंबून **दिनांक** ०९/०२/२०१० रोजी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, पहिला मजला, समिती सभागृह येथे खालील नमुद रेतीगट क्रमांक १अ-१ब, २अ-२ब, ३, ६ व ७अ-७ब-७क या खालील नमुद केलेल्या तपशिलातील रेतीगटाच्या लिलावाची प्रक्रिया उपरोक्त तारखेस अनुक्रमे सकाळी ११.०० वा, दुपारी १२.०० वा, दुपारी १.०० वा, दुपारी २.३० वा. व दुपारी ३.३० वा. आयोजीत करण्यात आली आहे.

जाहीर लिलावाच्या व मोहरबंद निविदांच्या अटी/शर्ती बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय रेतीगट शाखेमध्ये तसेच ठाणे जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयात, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयात व अपर जिल्हाधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार, यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध राहतील.

| अ. क्र. | प्रमुख रेतीगट क्रमांक | रेती उत्खनन करावयाच्या क्षेत्राचा तपशिल | उत्खननाची पध्दत/ साधने | महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाकडील सर्वेक्षणानुसार उपलब्ध रेतीसाठा परिमाण (ब्रासमध्ये) | उपलब्ध कालावधी करीता उत्खनना साठी अनुज्ञेय रेती साठा (ब्रासमध्ये) | हातची किंमत (Upset Price) रक्कम (रुपये) | निविदा/अर्जा सोबत भरावयाची बयाणा रक्कम.(रुपये) (रकाना ७ मधील रक्कमेच्या १० टक्के प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | १अ-१ब | १) वसई बंदर ते पाणजु बेट लांबी २.३ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७ मी. | २.३ कि.मी. क्षेत्राकरिता डुबीद्वारे | २,६३,६४१ | ३,९१,१७२ | १७,६०,२७,४००/- | १,७६,०२,७४०/- |
| | | २) पाणजु बेट ते घोडबंदर लांबी ५.८ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७ मी. | ६.८ कि.मी. क्षेत्राकरिता ६ ड्रेझर्स | ५,५८,०३९ | | | |
| | | ३) घोडबंदर ते गायमुख बंदर लांबी १ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७ मी.. | | ४३,६४० | | | |
| | | **एकुण** | ६ ड्रेझर्स | **८,६५,३२०** | **३,९१,१७२** | १७,६०,२७,४००/- | १,७६,०२,७४०/- |
| २ | २अ-२ब | १) गोमुख बंदर ते कामवाडी नदी (वाघबीळ) लांबी ५कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७ मी.. | ५ कि.मी. क्षेत्राकरिता डुबीद्वारे | ४६,००० | ४१,१३७ | १,८५,११,६५०/- | १८,५१,१६५/- |
| | | २) कामवाडी नदी (वाघबीळ) ते कशेळी ब्रिज लांबी ४.४ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७ मी.. | ४.४ कि.मी. क्षेत्राकरिता डुबीद्वारे | ४५,००० | | | |
| | | **एकुण** | | **९१,०००** | **४१,१३७** | १,८५,११,६५०/- | १८,५१,१६५/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३ | १) कशेळी ब्रीज ते मुंब्रा लांबी ५.० कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७मी.. | २१.५ कि.मी. क्षेत्राकरिता २१ ड्रेझर्स | ६२,६४७ | ३,०२,५८८ | १३,६१,६४,६००/- | १,३६,१६,४६०/- |
| | | २) डोंबिवली ते कल्याण लांबी ६.५ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७ मी.. | | ३,४६,६५८ | | | |
| | | ३) कल्याण ते उबंर्डे लांबी ६.० कि.मी, रुंदी ५० मी, खोली ७ मी.. | | १,१३,७३४ | | | |
| | | ४) उबंर्डे ते देवरुंग पाडा (काळु संगम)लांबी ४.०कि.मी, रुंदी ५० मी, खोली ७ मी.. | | १,४६,३२२ | | | |
| | | **एकुण** | २१ ड्रेझर्स | **६,६९,३६१** | ३,०२,५८८ | १३,६१,६४,६००/- | १,३६,१६,४६०/- |
| ४ | ६ | १) पनवेल खाडीमुख ते ट्रॉम्बे लांबी ३.४कि.मी, रुंदी २०० मी, खोली ५ मी.. | १५.३ कि.मी. क्षेत्राकरिता १५ ड्रेझर्स | २,९९,८५९ | ४,६५,९८४ | २०,९६,९२,८००/- | २,०९,६९,२८०/- |
| | | २) ट्रॉम्बे ते वाशी पुल लांबी १.६ कि.मी, रुंदी २०० मी, खोली ५मी.. | | १,०४,८०६ | | | |
| | | ३) वाशी पुल ते घणसोली लांबी ५.८ कि.मी, रुंदी २०० मी, खोली ५ मी.. | | २,८५,८६६ | | | |
| | | ४) घणसोली ते (एम.आय.डी.सी पाण्याची टाकी) ते ठाणे मीठ बंदर लांबी ४.५ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ५ मी.. | | ३,४०,२८२ | | | |
| | | **एकुण** | १५ ड्रेझर्स | १०,३०,८१३ | ४,६५,९८४ | २०,९६,९२,८००/- | २,०९,६९,२८०/- |
| ५ | ७-अ | १) दातीवरे ते मरबल पाडा लांबी ४.० कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७ मी.. | ४ कि.मी. क्षेत्राकरिता डुबीद्वारे | १,१८,२५० | ४,२९,७५६ | १९,३३,९०,२००/- | १,९३,३९,०२०/- |
| | | २) मरबल पाडा ते ज्युली बेट लांबी ७.३ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ७ मी.. | ७.३ कि.मी. क्षेत्राकरिता डुबीद्वारे | २,७२,२०५ | | | |
| | | ३) ज्युली बेट ते वैतरणा रेल्वे ब्रीज लांबी ६.६ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ५ मी.. | ६.६ कि.मी. क्षेत्राकरिता डुबीद्वारे | १,३४,७४८ | | | |
| | ७-ब | १) वैतरणा रेल्वे पुल ते उंचावली लांबी १५ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ५ मी.. | १५ कि.मी. क्षेत्राकरिता डुबीद्वारे | २,९७,८२५ | | | |
| | ७-क | १) उचावली ते पारगांव लांबी २.९ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ५ मी.. | ६.२ कि.मी. क्षेत्राकरिता ६ ड्रेझर्स | ४२,५४९ | | | |
| | | २) पारगांव ते लालठाणे लांबी ३.३ कि.मी, रुंदी १०० मी, खोली ५ मी.. | | ८५,०९५ | | | |
| | | **एकुण** | ६ ड्रेझर्स | ९,५०,६७२ | ४,२९,७५६ | १९,३३,९०,२००/- | १,९३,३९,०२०/- |
| **एकुण एकंदर (१अ-१ब,२अ-२ब ३, ६, व ७अ-७ब-७क )** | | | | ३६,०७,१६६ | १६,३०,६३७ | ७३,३७,८६,६५०/- | ७,३३,७८,६६५/- |

<u>अटी व शर्ती</u>

१) रेती गटात रेती उत्खनन करण्याचा कालावधी, रेतीगटाचा ताबा घेतल्यापासून **दिनांक ३१/०७/२०१०** पर्यंत राहील व कोणत्याही कारणास्तव कोणत्याही स्वरुपाची मुदतवाढ देण्यात येणार नाही.

२) अ) उपरोक्त पाचही रेतीगटाच्या लिलावाची सविस्तर माहिती तसेच लिलावात भाग घेण्यासाठीच्या अर्जाचे नमुने व कोरी निविदा, लिलावाच्या अटी/शर्तीसह स्वतंत्रपणे प्रत्येक रेतीगटासाठी रोख **रक्कम रु. १०००-०० (एक हजार रुपये)** जमा केल्यावर जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, चौथा मजला, रेतीगट शाखा, यांचे कार्यालयात लिलाव जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ते **दिनांक ०८/०२/२०१०** पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) कार्यालयीन वेळेत प्राप्त होतील.
**ब)** उपरोक्त ५ ही रेतीगटाच्या लिलावाचा अर्ज व निविदा प्रत्येक गटासाठी स्वतंत्रपणे भरणे बंधनकारक राहील.

३) उपरोक्त रेती गटाच्या लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या व निविदा भरु इच्छिणा-या व्यक्ती, संस्था यांनी वरील तक्त्यातील रकाना ८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित रेतीगटासाठी बयाणाच्या रक्कमेचा जिल्हाधिकारी ठाणे यांचे नावे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट, मोहरबंद निविदा/लिलावात भाग घेण्याच्या अर्जासोबत लिलाव जाहीर झाल्याच्या दिनांकापासुन ते **दिनांक ०८/०२/२०१०** पर्यत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा खनिकर्म अधिकारी, तहसिलदार रेतीगट ठाणे यांचेकडे सादर करावा. **दिनांक** ०८/०२/२०१० रोजी सायंकाळी ५.३० वाजेनंतर कोणताही अर्ज अथवा निविदा स्वीकारली जाणार नाही.

४) मोहरबंद निविदा भरणा-या व्यक्ती/संस्था यांना खुल्या लिलावातही भाग घेण्याची अनुमती आहे.

५) **दिनांक** ०९/०२/२०१० रोजी प्रत्येक गटाची खुल्या लिलावाची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याच ठिकाणी त्याच वेळी मोहरबंद निविदा उघडण्यात येतील. खुला लिलाव व मोहरबंद निविदा यामध्ये जी जास्त रक्कम येईल त्यांच्या नांवे निविदेतील नमुद अटी व शर्तीच्या नुसार लिलाव अंतिम करण्यात येईल.

६) ज्या व्यक्तीच्या नांवे लिलाव/निविदा अंतिम करण्यात येईल त्याला देकाराच्या रक्कमेच्या १/४ रक्कम लिलावाच्या दिवशी जिल्हाधिकारी ठाणे यांचे नावावर काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्ट द्वारे जिल्हा खनिकर्म अधिकारी, तहसिलदार रेतीगट ठाणे, यांचेकडे जमा करावी लागेल. जर देकाराच्या रक्कमेच्या १/४ रक्कम लिलाव धारकाने त्याच दिवशी शासन जमा केली नाही तर त्यांनी भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व त्यांचे नांवे मंजूर केलेला लिलाव/निविदा रद्द करण्यात येईल.

७) लिलावातील/निविदेतील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर व १/४ रक्कम भरल्यानंतर १५ दिवसात बोलीची उर्वरित रक्कम भरण्यात येईल अशा हमीचे दायित्व स्विकारणा-या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये २००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा लिलावाच्या दिनांकापासुन ५ दिवसात करुन देईल. स्वतःच्या व असे दायित्व स्वीकारणा-या दोन व्यक्तींच्या मालमत्तेचा तपशिल पुराव्यासह सादर करणे बंधनकारक राहील. असा करारनामा व उर्वरित ३/४ रक्कम निर्धारित कालावधीत जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे न दिल्यास भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित रेती / वाळू गटाचा फेर लिलाव करण्यात येईल. तसेच वरील प्रमाणे लिलाव रद्द झाल्यामुळे लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

८) रेती गटामध्ये रेती/वाळू साठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, तसेच वाळुचा दर्जा बाबत खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील.

९) ज्याच्या नांवे लिलाव मंजूर करण्यात येईल त्याला उत्खनन क्षेत्राच्या महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड मुंबई यांनी निश्चित केलेल्या गटनिहाय सर्वेक्षण शुल्काची रक्कम रेतीगट क्रमांक १अ-१ब करीता **रक्कम रु.**

९,१७,६९६/-, रेतीगट क्रमांक २अ-२ब करीता **रक्कम रु. ६,५२,९७६/-**, रेतीगट क्रमांक ३ करिता **रक्कम रु.१७,२९,५०४/-**, रेतीगट क्रमांक ६ करीता **रक्कम रु.१७,२९,५०४/-** रेतीगट क्रमांक ७ करीता **रक्कम रु.२२,७६,५९२/-** महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड मुंबई यांचे नांवे काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे लिलावाच्या दिवशी जमा करावी लागेल.

१०) ज्या व्यक्तींच्या नांवे लिलाव अंतिम करण्यात येईल त्यांनी लिलाव उच्चत्तम बोलीच्या रक्कमेवरील इनकम टॅक्स विभागाकडील **२.०६ टक्के** टि.सी.एस. लिलावधारकास भरावा लागेल. याशिवाय केंद्र शासन/राज्य शासन यांच्या कराचे उत्तरदायित्व असेल तर ते भरणे बंधनकारक राहील.

११)अ) निविदेसोबत जोडण्यात आलेल्या महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाने उत्खननासाठी देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाण पत्राबाबतचे **परिशिष्ट १** मधील तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्रामधील अटी शर्ती लिलाव/निविदा धारकांवर बंधनकारक असतील व त्याप्रमाणे आवश्यक त्या पूर्व परवानग्या यशस्वी लिलावधारकांना घेणे बंधनकारक राहील.
ब) तसेच ज्यांच्या नांवे लिलाव मंजूर करण्यात येईल त्याला त्या गटाकरिता उपलब्ध कालावधीकरीता अनुज्ञेय साठयाचे उत्खनन करता येईल. त्यापेक्षा अधिक साठयाचे उत्खनन करता येणार नाही. (रेतीगट तपशिलात नमुद केलेला रकाना क्रमांक ६ प्रमाणे).

१२)लिलाव स्वीकारणे, तहकुब करणे अथवा रद्द करणे किंवा लिलावाचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही बाबतचे अंतिम निर्णयाचे अधिकार जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

लिलाव गटाचा तपशिल, लिलावाच्या अटी व शर्ती, उत्खननासाठी राखीव क्षेत्राची माहिती व महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाने उत्खननासाठी दर्शविलेल्या क्षेत्राचे नकाशे इत्यादी माहिती जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, चौथा माळा, रेतीगट शाखा, यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये पाहावयास मिळतील.

सही /-
(ए.एल.ज-हाड)
**जिल्हाधिकारी ठाणे**

टिप :- रेती लिलाव जाहीरनामा व इतर अटी शर्ती **www.thane.gov.in** या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहेत.